# जेजुरीचा खंडोबा- मराठा कालीन राज्य कर्त्यांचा कुलधर्म कुळाचार

**प्रा. दादासाहेब बापूराव जाधव**
इतिहास विभाग श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.

**प्रा. सतिश बाबुराव जाधव**
आंदरूड माध्य. आणि उच्चमाध्यमिक विद्यालय, आंदरूड
ता. फलटण, जि. सातारा

---

**घोषवारा** जेजुरीचा खंडोबा अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत आहे. खंडोबा दैवताच्या पुजनास अनादी काळापासून सुरवात झालेली आढळून येते. कालांतराने महाराष्ट्रात मराठा साम्राज्य निर्माण झाले. मराठा साम्राज्यातील राज्यकर्त्यांना जेजुरीच्या खंडोबास मानाचे स्थान दिले. जेजुरी येथे आपल्या कुळानुसार कुलधर्म पार पाडला. तर या ठिकाणी खंडोबा मंदिराच्या कोटाची बांधणी, तसेच इतर सोईसुविधा निर्माण केलेल्या दिसून येतात. भक्तीभावाने खंडोबास साकडे घातल्याचे आढळून येते. नवसाखातर किंवा नवसानुसार बांधकामे, मुर्ती, दागदागीने व इतर साहित्य अर्पण करण्यात आले. एकूणच खंडोबा दैवतास राज्यकर्त्यांनी दिलेला मान संबंधीत शोध निबंधामध्ये मांडण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :** महाराष्ट्रामध्ये अनेक प्रादेशिक दैवते म्हणून प्रसिद्धीस आलेली आहेत. राम, कृष्ण, शिव हि प्रादेशिक दैवते तर मरिआई, सटवाई, मुंजाणा, भूतोबा, म्हसोबा, गिरोबा, वेताळ इ. ग्रामदैवते होय. दैवतांना अनादिकाळापासून जनमानसात महत्व प्राप्त झाले आहे. मात्र मध्ययुगात संपूर्ण भारता बरोबर महाराष्ट्रात तांत्रिकांचे प्राबल्य वाढले. याचा परिणाम दैवतांच्या लोकप्रियतेवर घडून आला. तांत्रिकांनी ग्राम दैवतांना महत्व दिले त्यांचे उन्नयन केले. त्यामुळे या ग्राम दैवतांना महत्व प्राप्त झाले. तर खंडोबा दैवत प्रादेशिक आणि ग्राम दैवत अशा दोन्ही रूपात पुजले जाणारे दैवत आहे. खंडोबा दैवताचा मुळ उगम कानडी मुलखातील मात्र या दैवताची लोकप्रियता जसजसी वाढली तसपसी महाराष्ट्र तसेच आंध्रप्रदेशात अनेक जागृत स्थाने निर्माण झाली. खंडोबा दैवताच्या अनेक जागृत स्थानांमध्ये जेजुरी या स्थानास महत्त्व प्राप्त झाले आहे. जेजुरीच्या खंडोबास अनेक राजघराण्यांनी आपला रक्षणकर्ता तर बहुजनांनी पालनकर्ता म्हणून त्याकडे पाहिले. खंडोबाच्या लोकप्रियतेस मध्ययुगीन काळापासून सुरवातझाली. तर मराठा काळातही जेजुरीच्या खंडोबाचे महत्त्व टिकून होते. जेजुरी येथील गडवजा मंदिराची बांधणी पासून अनेक लोकपयोगी कामे वेगवेगळ्या राजघराण्यांनी केली. उदा. भोसले, पेशवे, होळकर पानसे याचबरोबर अनेक जहागीरदार,वतनदार, सावकार यांनी जेजुरीच्या खंडोबास मानाचे स्थान दिलेले होते.

**भोसले कुल - जेजुरीच्या खंडोबाचा कुळाचार :** भोसले कुलाचा कुलस्वामी जेजुरीचा खंडोबा होते. म्हणून जेजुरीच्या खंडोबास मुर्ती अर्पण करणे, नवससायास बोलणे इ. कुळाचार केलेले आढळून येतात. जेजुरी येथील मंदिरातील एका मुर्तीवर पुढील प्रमाणे एक श्लोक आहे. ''मालोजी भोसल्याचे उदर जलनिधी शाहशीतांशू झाला तडर्भिश्लोकराजा तनयावर तिथे त्यास दीपा बिकेल (१०) शाहक्ष्याप : शारीफा वानिससुगुण तको जिभूपार्क वंशी खंडेराया स्वदेवाशरभन्हपरवे आर्पिले जेजुरीस''[१] खंडोबा दैवत अनेक नामांनी जनमानसात प्रसिद्ध आहे. उदा. मल्हारी, मल्हारी, मार्तंण्ड, मलुखान, इ. होय. तर मालोजी राजे भोसले यांचे मालोजी हे नांव खंडोबा दैवताच्या नावावरून ठेवले गेल्याचे आढळते.[२] मालोजीराजे यांच्या कालखंडानंतर जेजुरीशी संदर्भ येतो तो शहाजीराजे शिवाजीराजे यांच्या भेटीच्या संदर्भातील शिवाजी महाराजांनी स्वतंत्र मराठा साम्राज्याची स्थापना केली. या साम्राज्यास आपल्या कुळाचा कुलस्वामी जेजुरीच्या खंडोबा दैवताचा आशिर्वाद मिळावा म्हणून शहाजीराजे यांनी नवस केलेला होता. शहाजीराजे बंगळूर येथे वास्तव्यास होते. पुढे त्यांना महाराष्ट्रात येण्याचा प्रसंग आला. महाराष्ट्रात आल्या नंतर पुत्र शिवाजीराजे यांची भेट घेण्याचे नियोजन होते. म्हणून जाणकार मंडळीच्या मतानुसार पितापुत्र भेट एखादा तीर्थस्थानी व्हावी अशी कामना व्यक्त करण्यात आली म्हणून भेट जेजुरी येथे खंडोबा देवाच्या आशिर्वादाने व्हावी असे ठरले.[३] शहाजीराजे व शिवाजी राजे यांची भेट तब्बल २४ वर्षांनी होणार होती. जेजुरी येथे गडाच्या मध्यावर एक शामियाना उभारण्यात आला. शहाजीराजांच्या स्वागतासाठी मोरो त्रिमल पिंगळे यांना पाठविण्यात आले. शहाजीराजे जेजुरी येथे येताच प्रथम त्यांनी खंडोबा दैवाचे दर्शन घेतले. नंतर शमियान्यामध्ये आले असता त्यांनी साजुक तुपाच्या परातीत आपले मुख पहात असताना पुत्र शिवाजी, सुनबाई सोयराबाई तर नातु संभाजी या सर्व मंडळींनी शहाजीराजांचे मुख दर्शन घेतले. रिवाजा प्रमाणे भेटाभेटी झाल्या.[४] या भेटीच्या प्रत्यार्थ शहाजी राजांनी एकलक्ष रुपयांच्या ''सुवर्णमुर्ती' अर्पण केल्या.[५] हि भेट इ.स. १६६१ ते १६६२ च्या दरम्यान झाली असावी. मात्र या भेटीविषयी दुमत आहे. कारण काही विद्वानांच्या मते भेट पुण्यात तर काहिच्या मते फलटण नजीक आरडगावयेथे झाली. मात्र साधार भेट जेजुरी येथे झाली.[६] कारण जेजुरी येथे ज्या ठिकाणी भेट झाली. त्या ठिकाणाला आडीच पायरी पिता-पूत्र भेटीची आजही आठवण करून देते. महाराष्ट्रातील जहागीरीची व्यवस्था शहाजीराजे यांनी पत्नी जीजाबाई यांच्यावर सोपविलेली होती. जीजाबाई जहागीरीचा कारभार सांभाळत होत्या. त्यावेळी जेजुरीचे देवस्थान शहाजीराजे यांच्या जहागीरीत मोडत असताना खंडोबा देवांच्या पूजाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला त्यावेळी जीजाबाईंनी योग्य न्याय देवून वादाचा निकाल लावला.[७]

**सातारचे छत्रपती शाहू महाराजे - जेजुरीच्या खंडोबाचा कुळाचार :** संभाजी राजांचे पूत्र शाहू यांची मुघलांच्या कैदेतून सुटका झाली. शाहू

मुघलांच्या कैदेतुन सुटल्यानंतर त्यांनी आपल्या कुलाचा कुलस्वामी जेजुरीचा खंडोबा देवाचे दर्शन घेतले. जेजुरी येथे आल्यानंतर त्यांनी देवाच्या सेवेसाठी तीन गावे इनाम म्हणून दिली. या तीन गावापैकी कोऱ्हाळे गाव गोसावी या ब्रह्मणास दिले. व चांदीचा एक मुर्तीचा जोड अर्पण केला.[८]

**कोल्हापूरचे संभाजी राजे- जेजुरीच्या खंडोबाचा कुळाचार :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर मराठा साम्राज्य टिकविण्याचा प्रयत्न संभाजी, राजाराम यांनी केला. राजारामानंतर महाराणी ताराबाई यांनी मराठा साम्राज्याचे रक्षण केले. मात्र शाहूंची मुघलांच्या कैदेतुन सुटका झाली व गृहकलहास सुरूवात झाली. याचा परिणाम मराठ्यांच्या दोन गाद्या निर्माण झाल्या. सातारा व कोल्हापूर पुढे हा वाद वारणेच्या तहानुसार संपुष्ठात आला. कोल्हापूरचे संभाजी व सातारचे शाहू यांच्यामध्ये समेट घडून आली. त्यावेळी कोल्हापूरचे संभाजी महाराज सातारा या ठिकाणी काले असता त्यांनी जेजुरी येथे नानासाहेब पेशव्यांची भेट घेतली. जेजुरीत आल्यानंतर त्यांनी आपल्या कुळानुसार कुळाचार केला दानधर्म केला.९

**कोल्हापूरच्या जीजाबाई व माधवराव यांची भेट :** मराठा साम्राज्याच्या दोन गाद्या निर्माण झालेल्या होत्या. कोल्हापूर व सातारा. कोल्हापूर गादी संभाजीराजे यांच्याकडे तर सातारा शाहू महाराजांकडे होय. पुढे संभाजीराजे यांचा मृत्यू झाला. संभाजीराजे यांना अपत्य नव्हते म्हणून वारशाचा प्रश्न निर्माण झाला दौलतीचा कारभार राणी जीजाबाई पहात होत्या. संभाजी राजे यांच्या दुसऱ्या राणी कुसाबाई यांना दिवस गेलेले होते. जोपर्यंत कुसाबाईंना अपत्य होत नाही तोपर्यंत वारसा प्रश्न स्थगित होता. मात्र पेशव्यांचा असा बेत होता की, कोल्हापूरच्या गादीस वारस नसल्यामुळे कोल्हापूर व सातारा आशा दोन गाद्यांची मिळून एक गादी करण्यात यावी. मात्र यास जीजाबाईंचा प्रखर विरोध होता. जीजाबाई वरचेवर पेशवे माधवरावांशी पत्रव्यवहार करीत होत्या. कुसाबाई प्रसूत झाल्या त्यांना कन्या झाली पून्हा वारशाचा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी संभाजीराजांच्या मृत्यूसमईची कामना जीजाबाईंनी दरबारात मांडली की, संभाजीराजांच्या इच्छेनुसार इंदापूर परगण्यातील शरिफजीच्या वंशातील शहाजीराजे भोसले खानावटकर यांचा मुलगा माणकोजी यास दत्त घेण्यात यावे. परंतू माधवरावांनी दत्तक घेण्यास विरोध केला. त्यावेळी जीजाबाई तीर्थयात्रा करत करत जेजुरी येथे आल्या. जेजुरीयेथे आल्यानंतर माधवरावांनी पुण्याहून येवून त्यांची भेट घेतली. व कोल्हापूर गादी विषयी सविस्तर विचार विनीमय करण्यात आला.[१०]

**नागपूरकर भोसले – जेजुरीच्या खंडोबाचा कुळाचार** : नागपूरचे मुधोजी भोसले इ. स. १७८५ मध्ये पुणे दरबाराच्या वतीने बदामीच्या स्वारीत सामील झाले होते. त्यावेळी मुधोजी भोसले व त्यांची पत्नी चिमाबाई, व कुटूंबातील इतर मंडळी या सर्वांनी जेजुरी येथे येवून आपल्या कुळानुसार जागरण गोंधळ, तळीविधी, दानधर्म इ. धर्म कार्ये पार पाडली.[११]

**जेजुरी येथील पेशवे तलावाचे बांधकाम :** जेजुरी या ठिकाणी खंडोबा देवाच्या भक्तांसाठी श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांनी ३६ एकर क्षेत्रावर इ.स. १७३४ मध्ये तलावाचे बांधकाम केले. तसेच या तलावाच्या सभोवती सावलीसाठी चिंचेची बाग लावण्यात आलेली होती.[१२] या तळ्याच्या बांधकामा संबंधीतचे पत्र उपलब्ध आहे. या पत्रामध्ये जमीनीबाबत माहिती, बांधकामा बाबत सविस्तर तपशिल दिलेला आहे. [१३]

**जेजुरीच्या खंडोबाचे इतिहास प्रसिद्ध नवस :**

**नाना फडणविसांचा खंडोबास नवस :** नारायणरावांचा वध राघोबादादा याने घडवून आणला. नारायणरावांच्या वधानंतर पेशवे पदाचा प्रश्न निर्माण झाला. राघोबादादा स्वत: पेशवा बनला. परंतू बारभाई मंडळाने मराठा दौलतीचा कारभार सांभाळलेला होता. बारभाई मंडळास राघोबा पेशवा म्हणुन मान्य नव्हता. त्यावेळी नारायण रावांची पत्नी गंगाबाई यांना दिवस गेलेले होते. राघोबादादा गंगाबाई यांच्या जीवास अपाय करिल म्हणून नानांनी गंगाबाई यांना पूरंदर किल्ल्यात बंदोबस्तात ठेवले. गंगाबाईंना पूत्र व्हावा म्हणून जेजुरीच्या खंडोबा बरोबर इतर दैवतांना नानानी नवस केले. गंगाबाईंना पूरंदर किल्यावर पूत्र प्राप्ती झाली. नवसाप्रमाणे नानांनी जेजुरी येथे खंडोबा दैवताचा नवस पूर्ण केला.[१४]

**चित्रोजी बांडे यांचे खंडोबास नवस :** मराठा सरदार चित्रोजी बांडे याने जेजुरीच्या खंडोबास नवस केला. नवसामध्ये त्याने अपत्य प्राप्तीची कामना व्यक्त केली. पुढे चित्रोजी बांडे यांना अपत्य प्राप्ती झाली म्हणून नवसाखातर खंडोबास हत्ती अर्पण करण्यात आला१५

**सरदार पानसे बंधुंचा खंडोबास नवस :** सोनोरी गावचे सरदार महिपतराव पानसे व भीमराव पानसे यांनी जेजुरीच्या खंडोबास आपल्या मनातील कामना पूर्ण व्हावी म्हणून नवस केला. नवसाप्रमाणे त्यांची कामना पूर्ण झाली म्हणून ४२ किलो वजनाचा खंडा (तलवार) खंडोबास अर्पण करण्यात आला. [१६] आजही दसरा उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ४२ किलो वजनाचा खंडा उचलण्याची स्पर्धा आयोजित केली जाते. तसेच खंडोबा दैवताचे संशोधक गुंथर सोनाथापमर यांनी जर्मनी येथे खंडा (तलवार) यावर लघुपट प्रदर्शित केलेला आहे.[१७]

**पोर्तुगीजकालीन घंटा :** बाजीराव पेशवे यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी वसईवर चढाई केली. वसई पोर्तुगीजांच्या अधिपत्याखाली होती. चिमाजी आप्पा यांनी वसईवर प्रकर हल्ला करून पोर्तुगीजांचा पराभव करण्यात आला. संपूर्ण वसई लुटण्यात आली. या लुटीत चर्चमधील घंटा आणल्या गेल्या त्यातील एक घंटा जेजुरीचा खंडोबा देवास अर्पण करण्यात आली.[१८]

**होळकर घराण्याचे जेजुरीस योगदान :**

**होळकर घराण्याचे जेजुरीस योगदान :** होळकर घराणे धनगर समाजीतील होय. मल्हारराव होळकर यांनी स्वपराक्रमाणे मराठा साम्राज्यात

आपला ठसा निर्माण केला. मात्र त्यांची अशी धारणा होती कि आपला उत्कर्ष जेजुरीचा खंडोबा या दैवतामुळे झालेला आहे. खंडोबा दैवताचा आशिर्वाद सदैव आपल्या पाठीशी आहे.म्हणून त्यांनी जेजुरी येथील गडवजा मंदिराच्या कोटाचे बांधकाम केले. या कोटास ९ मार्च १६७० या दिवशी सुरवात केली तर रुपये ५८,००० इतका खर्च करण्यात आला. [१९] पुढे तुकोजी होळकर व आहिल्याबाई होळकर यांनी जेजुरीयेथे अनेक लोकपयोगी कामे केली उदा. अन्नछत्र, जानाईतीर्थ, तलाव बांधकाम इ. होय. अहिल्याबाई होळकर यांनी तुकोजी होळकर यांना मल्हार गौतमेश्वराची छत्री व तळ्याचे बांधकाम इत्यादीसाठी मार्गदर्शन केले. [२०]

**सारांश :** एकूणच मराठा कालखंडात खंडोबा दैवताचे महत्व जनमानसा बरोबरच राज्यकर्त्यांनी राखल्याचे आढळून येते.अनेक मराठा राजघराण्यांनी जेजुरी येथे येऊन खंडोबा दैवताचा कूळाप्रमाणे कूळाचार केला. कुळाचार करत असताना खंडोबा दैवताच्या भक्तांसाठी सोई-सुविधा, उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. अनेक लोकपयोगी कामे केल्याचे आढळून येते.

**संदर्भ ग्रंथ सुची**


१) द. वा. पोतदार भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, वार्षिक इतिवृत्त शके १८३५ पृष्ठ क्र. २५६

२) हरि बाळकृष्ण आरोळे श्रीनाथ म्हस्कोबा देवाचे चरित्र,प्रकाशन- तात्याबा नाना हेंद्रेबीरकर पुणे, १९२६ पृष्ठ क्र. १६

३) श्रीधर तळेकर श्री. शहाजीराजे भोसले, प्रकाशक- तळेकर फिचर सर्व्हिस, बेळगांव प्रथमावृत्ती २७-३-१९७१ पृष्ठ-५३

४) वि. का. राजवाडे (संपा)जयराम पिंडये कृत राधामाधव विलास पुनमुद्रण - पुणे ह्व १९८९ प्रस्तापना - पृष्ठ क्र. ९८

५) श्रीधर तलेकर उपरोक्त पृष्ठ क्र. ५४

५) श्रीधर तलेकर उपरोक्त पृष्ठ क्र. ५४

६) त्रंबक शंकर शेजवलकर श्री शिव छत्रपती मराठा मंदिर मुंबई प्रथमावृत्ती ऑक्ट १९६४ पृष्ठ क्र. २१२

७) सुधारक पुंडलिक पवार मराठे शाहितील पत्ररूप गद्य (इ.स. १६५० ते १७५०)शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर १९७८ पृष्ठ - १८१

८) कु. मेघा सुखदेव गायकवाड दक्षिण भारतातील एकजागृत दैवत वसंत बुक स्टॉल, मुंबई, प्रथमावृत्ती २००९ पृष्ठ क्र. ४३

९) स. मा. गर्गे करवीर रियासत श्री शहाजी छत्रपती म्युजिअम ट्रस्ट, कोल्हापूर ३ री आवृत्ती जाने. २००३ पृष्ठ क्र. २११

१०) डॉ. जयसिंगराव पवार मराठे शाहिचे अंतरंग, सुमेट प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००१ पृष्ठ ७२

११) गो. सं. सरदेसाई मराठी रियासत खंड ७ वा. गर्व्हमेंट सेंन्ट्रल प्रेस मुंबई १९९१, पृष्ठ-५००

१२) Deshmuk (Sou- Vatsala Shahajirao Ph.d. Thises) (Geography) - Jejuri- A Study in Reliqious tourism Shivaji Univerisity Kolhapur (Unpublished) pag-38

१३) डॉ. भ. ग. कुटे(संप्र) संशोधनासाठी निवडलेले कागद (स. नि. का.)खंड -१ प्रकाशक - पूराभिलेख विभाग- महाराष्ट्रशासन नागपूर प्रथमावृत्ती १९७८ पृष्ठ क्र. ३०

१४) डॉ. पी. एन. गवळी पेशवे कालीन महाराष्ट्र कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, प्रथमावृत्ती १८ मे २००० पृष्ठ क्र. १०९

१५) गो. स. सरदेसाई पेशवे दप्तर खंड - ८ गर्व्हमेंट सैन्ट्रल प्रेस मुंबई १९३४ पृष्ठ क्र. ५४५

१६) चि. ग. कर्वे ऐतिहासिक संकिर्ण साहित्यखंड - ९ लेख- मराठी राजवटीतील घाटमार्ग व चौक्या भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, स्विय ग्रंथमाला ८७,१९५४ पृष्ठ क्र. ३६

१७) दै तरूण भारत दि. २० ऑक्टो, २००७ पृष्ठ क्र. २

१८) पं. महादेवशास्त्री जोशी भारतीय संस्कृती कोश खंड - ३ प्रकाशक रा. म. घेडारकर, पुणे, प्रथमावृत्ती १९७६- पृष्ठ - ६३०

१९) बा. बा. ठाकुर होळकर शाहीचा इतिहास भाग-२ होळकर गव्हर्मेंट प्रेस इंदोर प्रथमावृत्ती १९४० पृष्ठ क्र. ७५

२०) कै. विश्वनाथ नारायण देव देवी श्री आहिल्याबाई होळकर चरित्र प्रकाशक- डॉ. बळवंत नारायण देव, इंदोर, पृष्ठ ९५,९६